सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण
## जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे

टोल फ्री क्रमांक 1077 दुरध्वनी क्रमांक 020-26123371 E-Mail collector.pune@maharashtra.gov.in

वाचले : १.आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५
२.साथ रोग अधिनियम, १८९७
३.सार्वजनिक आरोग्य विभाग यांची अधिसुचना कोरोना २०२०/प्र.क्र.५८/आरोग्य५, दि.१४/०३/२०२०
४.प्रबंधक, मा.उच्च न्यायालय,मुंबई यांनी ठरवून दिलेले स्टॅंडर्ड ऑपरेटिंग प्रोसिजर.
५. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, महसूल व वन, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन यांचेकडील अधिसुचना क्र. DMU/२०२०.CR.९२/DisM-१ दि. ३१/०५/२०२०

क्र. जि.आ.व्य./कावि/ १४८७ /२०२०.
पुणे दिनांक ०७ /०६/२०२०

जिल्हाधिकारी पुणे

आदेश,

ज्याअर्थी, आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ मधील कलम २५ अन्वये जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाची स्थापना करण्यात आलेली आहे. व त्यातील पोट कलम २(अ) नुसार जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी हे उक्त प्राधिकरणाचे पदसिध्द अध्यक्ष आहेत.

आणि ज्याअर्थी, सद्यस्थितीत कोव्हिड-१९ विषाणू प्रादुर्भावाच्या अनुषंगाने दैनंदिन व्यवहार पुन:श्च सुरु करणे आणि बंधने टप्या-टप्याने शिथील करण्याची कार्यवाही चालू आहे.

त्याअर्थी, मी नवल किशोर राम, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण तथा जिल्हाधिकारी पुणे जिल्हयातील विविध न्यायालयांमध्ये लवकरच कामकाज सुरु होऊन अभ्यांगतांची संख्या वाढणार असल्याने, कोव्हिड-१९ या विषाणूचा संसर्ग व प्रादुर्भाव रोखण्याच्या अनुषंगाने पुणे जिल्हयातील विविध न्यायालयांमध्ये उपलब्ध नसणाऱ्या सुविधा खालील निर्देशाप्रमाणे उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी खालीलप्रमाणे निश्चित करीत आहे.

| अ.क्र. | संबंधित यंत्रणा | करावयाची कार्यवाही |
|---|---|---|
| १. | कार्यकारी अभियंता,<br>सार्वजनिक बांधकाम विभाग, पुणे | जिल्हयातील / तालुक्यातील सर्व प्रकारच्या विविध न्यायालयातील मा.न्यायमूर्ती यांच्या न्यायालयात जाणे-येणेसाठी केवळ एकच मार्ग उपलब्ध असणार याची खात्री करुन, कोव्हिड -१९ या विषाणूचा संसर्ग व प्रादुर्भाव रोखण्याच्या अनुषंगाने तेथे बेसिन, टॅबवॉटर व पाण्याची उपलब्धता, टॅंक, इत्यादी व्यवस्था करावी. तसेच टॅंकमध्ये पाणी राहील याची खात्री करावी. याबाबत आपले अधिनस्तस सर्व जिल्हा व तालुकास्तरीय यंत्रणांना सुचित करण्यात यावे. |
| २. | जिल्हा नियोजन अधिकारी,<br>जिल्हाधिकारी कार्यालय पुणे | ➢ प्रवेशव्दाराजवळ Sanitizer Machine with foot pedal किंवा Electronic Saniizer Despenser उपलब्ध करुन देण्यासाठी त्वरीत निधी उपलब्ध करुन देण्यात यावा.<br>➢ जिल्हयातील विविध न्यायालयातील मा.न्यायमूर्ती यांचेकडून कोव्हिड-१९ विषाणूचा संसर्ग कमी करण्याच्या अनुषंगाने नमूद सुविधा (जसे हॅन्डवॉश-साबण इ.) उपलब्ध करुन घेण्यासाठी निधीबाबत मागणी उपलब्ध करुन घेण्यात यावी. सदरील खर्च भागविण्यासाठी जिल्हा नियोजन समिती मार्फत निधी उपलब्ध करुन देण्यात यावा. हा निधी कोव्हिड विषयावरील उपाय योजनासाठीच्या (Recurring) खर्चा व्यतिरिक्त इतर बाबीसाठी खर्च करता येणार नाही. |

Scanned with CamScanner

| | | |
|---|---|---|
| ३. | सर्व उपविभागीय अधिकारी,<br>सर्व तहसिलदार जि.पुणे,<br>सर्व गटविकास अधिकारी,<br>सर्व मुख्याधिकारी नगर पंचायत,<br>नगर परिषद, नगरपालिका | ➢ कोर्टाच्या इमारतीस असणारा पाणी पुरवठा चालू आहे किंवा नाही याची खात्री करणे. तसेच हात धुण्यासाठी नळाला मुबलक पाणी उपलब्ध असणे, पाण्याचा पुरवठा विंधन विहीरीव्दारे असल्यास त्याचा पुरवठा व्यवस्थित होत असलेबाबत खात्री करावी. विंधन विहीरी खराब असल्यास दुरुस्त करुन घ्यावी. तसेच पाण्याचा स्त्रोत नसल्यास विंधन विहीर घेण्यात यावी. तथापि विंधन विहीरीमध्ये पाणी उपलब्ध होत नसल्यास टँकर अथवा इतर कोणत्याही माध्यमातून पाण्याची तात्काळ व्यवस्था संबंधित तालुक्यातील तहसिलदार यांनी करावी व अहवाल या कार्यालयास सादर करावा. प्रत्येक न्यायालयातील प्रमुख न्यायाधिश यांची तात्काळ भेट घ्यावी. |
| ४. | १) पुणे व पिंपरी चिंचवड महानगर पालिका<br>२) जिल्हा शल्यचिकित्सक पुणे,<br>३) जिल्हा आरोग्य अधिकारी,<br>जिल्हा परिषद पुणे, | ➢ २० लिटर सॅनिटायझर व इतर तत्सम साहित्य मागणीप्रमाणे तात्काळ विविध न्यायालयांमध्ये (जिल्हा न्यायालय/कौटुंबिक न्यायालय/तालुका न्यायालय/ कामगार न्यायालय/ सहकार न्यायालय/ हरीत न्यायाधिकरण इत्यादी सर्व न्यायालये) यांना उपलब्ध करुन दयावे. |
| ५. | १) पुणे व पिंपरी चिंचवड महानगर पालिका<br>२) जिल्हा परिषद पुणे | ➢ कोव्हिड-१९ या विषाणूचा संसर्ग व प्रादुर्भाव रोखण्याच्या अनुषंगाने काळजी घेणबाबत सुचना फलक (Flex) जिल्हयातील सर्व न्यायालयांच्या इमारतीच्या प्रवेशव्दारावर योग्य प्रकारे लावण्यात यावे. |
| ६. | सर्व उपविभागीय अधिकारी,<br>सर्व तहसिलदार जि.पुणे<br>कार्यकारी अभियंता,<br>सार्वजनिक बांधकाम विभाग पुणे | ➢ वरील व इतर सर्व बांधकामाविषयक बाबींसाठी सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता यांनी मा.न्यायामूर्ती यांचेशी समन्वय साधून आवश्यक त्या सुविधा उपलब्ध करुन देण्यात याव्या. तसेच तहसिलदार व सर्व उपविभागीय अधिकारी यांनी मा.न्यायमूर्ती यांचेशी भेट घेऊन सदर सुविधांमध्ये त्रुटी राहणार नाही याची दक्षता घ्यावी. |

मा.न्यायालयास उपलब्ध करुन दिलेल्या सर्व साहित्याची पोहच संबंधित अधिकाऱ्यांनी घ्यावी व स्टॉक बुकमध्ये नोंद ठेवावी. सर्व विभाग प्रमुखांनी वाचले क. ४ S.O.P. मधील सुचनानुसार कार्यवाही करावी.

उक्त नमूद विषयाचे अनुषंगाने तातडीने कार्यवाही करावी. व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल तात्काळ सादर करावा.

जिल्हाधिकारी पुणे

(नवल किशोर राम)
**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण,**
**जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे**

प्रत -

१. मा.विभागीय आयुक्त, पुणे विभाग पुणे यांचेकडेस माहितीस्तव सविनय सादर.
२. जिल्हा नियोजन अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय पुणे यांना आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.
३. प्रबंधक, मा.जिल्हा न्यायालय शिवाजीनगर पुणे यांना माहितीस्तव सविनय सादर.
४. जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद पुणे, यांना आवश्यक त्या कार्यवाहीसाठी
५. आरोग्य अधिकारी, पुणे व पिंपरी चिंचवड महानगर पालिका यांना आवश्यक त्या कार्यवाहीसाठी
६. कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग, पुणे यांना आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.
७. सर्व उपविभागीय अधिकारी जि.पुणे यांना आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.
८. सर्व तहसिलदार, जि.पुणे यांना आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.
९. जिल्हा परिषद पुणे यांना आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.
१०. सर्व गटविकास अधिकारी / सर्व मुख्याधिकारी नगर पंचायत, नगर परिषद, नगरपालिका यांना आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.
११. जिल्हा माहिती अधिकारी पुणे यांना आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.

Scanned with CamScanner